# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ,नाशिक
**MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES, NASHIK**

दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक-४२२००४ Dindori Road, Mhasrul, Nashik-422004

MUHS

EPABX: 0253- 2539100/300, Fax: 0253 - 2539134, Ph.: 2539219/178

Email: coe@muhs.ac.in Website: www.muhs.ac.in

**डॉ. अजित गजानन पाठक**
एम.बी.बी.एस., एम.डी.(न्यायवैद्यकशास्त्र),
**परीक्षा नियंत्रक**

**Dr. Ajit Gajanan Pathak**
M.B.B.S., M.D.(Forensic Medicine)
**Controller of Examinations**


जावक क्र. - मआविवि/एक्स-१/७३२४/२०२० दिनांक -१२/०२/२०२०

**परिपत्रक क्र.08/2020**

प्रति,

**अधिष्ठाता/प्राचार्य,**

सर्व संलग्नित वैद्यकीय महाविद्यालये,

**म.आ.बि.वि. नाशिक.**

विषय :- प्रथम वर्ष एम.बी.बी.एस.अभ्यासक्रमाबाबत...

**महोदय/महोदया,**

उपरोक्त विषयान्वये शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० पासून प्रथम वर्ष एम.बी.बी.एस. करिता नविन अभ्यासक्रम सुरु करण्यात आला.तथापि पूर्वीचा सुध्दा अभ्यासक्रम सुरु असल्याने महाविद्यालयस्तरावर अभ्यासक्रम राबविण्याबाबत अडचणी येत असल्याचे निदर्शनास आले. त्या अनुषंगाने सदर विषय दि.१८/१२/२०१९ रोजीच्या परीक्षा मंडळसभेसमोर ठेवण्यात आला असता खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला.

**"शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० पासून प्रथम वर्ष एम.बी.बी.एस. Compentency Based Under-graduate Curriculam for the Indian Medical Graduate या अभ्यासक्रमास प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांकरिता भारतीय आयुर्विज्ञान संस्था,नवी दिल्ली. यांच्या नियमानुसार प्रथम वर्ष एम.बी.बी.एस.चार वर्षामध्ये किंवा पुरवणी परीक्षेसह चार (१+३) प्रयत्नांत उत्तीर्ण करावा व प्रथम वर्ष शैक्षणिक वर्षात प्रवेशित झाल्यापासून संपूर्ण अभ्यासक्रम दहा (१०) वर्षात पूर्ण करावा.**

**तथापि शैक्षणिक वर्ष २०१८-२०१९ मध्ये व त्यापूर्वी एम.बी.बी.एस. अभ्यासक्रमास प्रवेशित झालेल्या सर्व विद्यार्थ्यांकरिता पूर्वीचाच अभ्यासक्रम व परीक्षा पद्धती सुरु ठेवण्यात यावी."** असा ठराव पारित करण्यात आला.

उक्त ठरावाच्या अनुषंगाने पूर्वीच्या (२०१८-२०१९ व त्याआधी प्रवेशित/पुनर्परीक्षार्थी) विद्यार्थ्यांकरिता विद्यापीठ परीक्षा साधारणत: मे-जून मध्ये तर नविन अभ्यासक्रमाची (२०१९-२०२० मध्ये प्रवेशित विद्यार्थी) परीक्षा सप्टेंबर मध्ये होईल. याबाबत सखोल माहितीकरिता विद्यापीठाच्या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिद्ध करण्यात येत असलेल्या वेळापत्रकाचा संदर्भ गृहीत धरावा. महाविद्यालय स्तरावर सदर निर्णयाची व्यापक प्रसिद्धी करण्यात यावी.

Dr A G PATHAK

परीक्षा नियंत्रक